**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# भारतीय स्त्री : शैक्षणिक वाटचाल

**दिगंबर दुर्गाडे, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे*

**Abstract**

*वैदिक काळापासून स्त्रीयांच्या बाबतीमध्ये विषमतेची वागणूक सातत्याने दिली जात होती. शिक्षण व्यवसाय, नोकरी, नेतृत्व या प्रत्येक बाबतीत स्त्रीयांना नाकारले जात होते. मात्र आधुनिक काळामध्ये काही समाज सुधारकांमुळे लोकशाही प्रणालीमुळे तसेच विविध आयोग, समित्या, विचारवंत व पुरोगामी लेखन यामुळे स्त्रीयांना सर्वच क्षेत्रात समानतेची वागणूक दिली जात आहे. परिणामी आज आपला देश वेगाने प्रगती साधत आहे. समाजाच्या प्रगतीमध्ये स्त्रीयांचे योगदान मोलाचे ठरले आहे.*

***महत्वाचे शब्द :*** *स्त्री, शिक्षण, योगदान*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १. प्रस्तावना

स्त्रीयांच्या बाबतीत मनूचेमते हे प्रतिगामी स्वरूपाचे होत. स्त्रीला स्वातंत्र्य देऊ नये या विचाराचा तो होता. अर्थातच तिच्यात निर्णय क्षमता व वैचारिक क्षमता नाही असे त्याचे मत होते. हिंदू समाज व्यवस्थेत स्त्रीला नेहमीच दुय्यम दर्जा होता. प्राचीन काळापासून अबला म्हणूनच स्त्रीकडे पाहिले जाई. तिची क्षमता सिध्द करण्यासाठी तिला कोणीही संधी दिली नाही. स्त्रीने लहानपणी पित्यावर, तरूणपणी पतीवर तर म्हातारपणी पुत्रावर अवलंबून रहावे. म्हणजेच ती कधीही स्वावलंबी बनू शकत नाही असा समाजमान्य समज होता.

संसारात मुलांना जन्म देऊन त्यांचे संगोपन करणे, पतीची, सासू सासऱ्यांची मनोभावे सेवा करणे, आल्या गेल्यांचा पाहुणचार करणे हे तिचे मुख्य कर्तव्य, पण लोक का विसरत होते की ती जरी नाजूक असली तरी डोंगराएवढी दुर्दम्य क्षमता तिच्यातही असते. स्त्रीच कर्तृत्वाविषयी इतिहासात आपल्याला अनेक दाखले मिळतात. स्त्रीयांचा समाजाच्या जडणघडणीमध्ये प्राचीन काळापासून मोठा वाटा आहे. अहिल्या, सिता, मंदोदरी, मैत्रेयी, गार्गी, तिलोत्तमा इ स्त्रीयांनी समाजाला दिशा देण्याचे काम केले. इंग्रजांच्या बलाढय ताकदीला आव्हान

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

देऊन “मेरी झांसी” नही दूंगी अशी गर्जना करून अगोरच श्वासापर्यंतत्यांच्याशी लढणारी राणी लक्ष्मीबाई स्त्रीच होती. जोपर्यंत स्त्री साक्षर होत नाही तोपर्यंत तिच्यावर अन्यायच होत राहणार हे जाणून घेवून स्त्री शिक्षणासाठी समाजाचे शेण, चिखल, दगडगोटे खाणारी सावित्रीबाई फुले ही स्त्रीच होती. राज्यातील जनतेच्या आर्थिक सामाजिक अडचणी दूर करून सामान्यजनतेला सुखी करणारी अहिल्याबाई होळकर स्त्रीच होती.

**२. सामाजिक सहभाग**

प्रत्येक क्षेत्रात आधुनिक काळामध्ये स्त्रीयांनी स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. राजकारणापासून उद्योगापर्यंत व संगणकापासून शेतीपर्यंत स्त्रीयांनी स्वत:चे कर्तृत्व सिध्द केले आहे. खेळामध्ये सुध्दा आज सानिया मिर्झा, सायना नेहवाल, मेरी कोम, पी व्ही सिंधू इ महिला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:चे कर्तृत्व सिध्द करत आहेत. आज असे कोणते क्षेत्र उरले आहे, जे तिने पादाक्रांत केले नाही? आकाशाला गवसनी घालणारी कल्पना चावला, सुनिता विल्यम्स स्त्रिच! भारत देशाच राज्यकारभाराचा गाडा ओढणारी पंतप्रधान इंदिरा गांधी, या स्त्रीच. तिहार तुरूंगातील अत्यंत क्रूर गुन्हेगारावर वचक बसविणारी आणि त्यांचे न्याय हक्क मिळवून देणारी किरण बेदी ही पोलिस अधिकारी स्त्रीच! विज्ञान तंत्रज्ञानाचे प्रगत ज्ञान असूनही समाजसेवेला झोकून देणारी सुधा मूर्ती स्त्रीच! ममतेचं, करूणेचं, आणि तगाचं ज्वलंत उदाहरण मदर तेरेसा या स्त्रीच! अशी प्रत्येक क्षेत्रातील कितीतरी उदाहरणे आपलला स्त्री कर्तृत्वाविषी सांगता येतील.

**३. स्त्री शिक्षणाची पार्श्वभूमी :**

प्राचीन काळापासून स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवले होते. पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा नाकारला होता. त्यांना कनिष्ठ स्तरावरील सामाजिक दर्जा दिला गेला होता. कुटूंबाच्या बाहेरचे सार्वजनिक अस्तित्व नाकारले होते. पुरूषांचे व कुटूंबाचे सेवा करणे हेच तिचे कर्तृत्व होते. मात्र स्त्रीयांना शिक्षण द्यायला सुरूवात केल्यापासून आज अत्यंत कमी कालावधीत त्यांनी पुरूषांच्या बरोबरीने स्वत:ची कर्तबगारी सिध्द केली आहे.

अगदी वैदिक काळापासून स्त्रीचा समावेश दुर्बल म्हणून केलेला दिसून येतो. वैदिक काळात भारतीय समाज व्यवस्था ही पितृप्रधान होती. मुलगा, मुलगी हा भेद अगदी पूर्वीपासून समाजात असलेला दिसून येतो. मुलगा जन्माला आला की वंशाला दिवा मिळाला असे मानून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला जाई. मुलगी जन्माला आली तर आनंदोत्सव साजरा केला जात नसे. पुढे मुलाला महत्वाच स्थान आणि मुलीला गौणत्व दिले जाई. मुलीचा संबंध हा चूल आणि मूल यांच्याशी प्रामुख्याने जोडला जाई.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

## ४. स्त्री शिक्षणाची स्थिती :

पूर्वीच्या काळी सिंधू संस्कृतीच्या काळात स्त्रीयांना समान मत दिले जात होते. किंबहुना स्त्री प्रधान व मातृसत्ताक पध्दती सिंधू नदीच्या आजूबाजूला होती. संस्कृती इस्लाम धर्माच्या आक्रमणामुळे स्त्रियांची स्थिती आणखी घसरली. त्या काळात पडदा पध्दत, बालविवाह पध्दत अस्तित्वात होती. जरठ कुमारी विवाह होत असत. सती जाण्याची चाल समाजात रूढ होती. विधवांची स्थिती अत्यंत शोचनीय होती. स्त्रियांना वारसा हक्क नव्हता, पुरूषांना महत्त्व असल्यामुळे स्त्रीला समाजात दुय्यम दर्जा होता. पुरूषांनी पुरूष प्रधानत्व सातत्याने टिकविण्याचा प्रयत्न केला. स्त्रीला समाजात सदैव कमी लेखल्यामुळे तिच्यामनात न्यूनगंड निर्माण होत गेला. तशात समाजाने तिच्यावर जाचक बंधने लादली. परकीयांपासून रक्षण करण्यासाठी पडदा पध्दत अस्तित्वात आली खरी, पण पुढे पडदा पाळणे हे खानदानीपणाचे लक्षण ठरले. स्त्रियांवरही याच विचारांचा पगडा बसला. त्या काळात स्त्रिांना घर ही लक्ष्मणरेषा ठरली. पुरूषांचे दास्त्यव त्यांच्या पदरी आले. रूढी, रितीरिवाज, परंपरा, अंधानुकरण यांचा पगडा दिवसेंदिवस वाढतच गेला.

कुटूंब चालविणे ही पुरूषाची जबाबदारी ठरलने स्त्रीला घराबाहेर जाण्याची संधी उपलब्ध होऊ शकली नाही. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य आणि स्त्रीच शिक्षणाची त्यामुळे पिछेहाट होत गेली. स्त्रीला गौणत्व देण्यात तिची बुध्दी कमी मानणे, तिची शारीरिक दुर्बलता, घरात तिला दिलेले गौणत्व, ती बेजबाबदार, भावनिक दृष्टा कमकुवत मानणे ही कारणे आहेत. समाजात स्त्रियांना सतत परावलंबी ठेवण्यात आलेले आढळून येते. बालवस्थेत वडिलांवर, तारूणवस्थेत पतीवर व वैधववस्थेत मुलांवर तिला अवलंबून रहावे लागत होते.

## ५. स्त्री शिक्षणाला चालना :

स्वातंत्रयापूर्वी म. फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडोकेशव कर्वे इ समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. स्वातंत्रयानंतर स्त्रीयांच्या शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल झाला व मोठया प्रमाणावर सर्व जाती धर्मातील गरीब, श्रीमंत, ग्रामीण शहरी, व काही प्रमाणात आदिवासी स्त्रीया शिक्षण घेवू लागल्या. समाजातील स्त्रिच्या दुर्देशेला शिक्षणाचा अभाव, अज्ञान व मागासलेपणा कारणीभूत होतात. म्हणून स्त्रिच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी, स्त्री पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी भारतातील अनेक विचारवंतांनी, समाजसुधारकांनी प्रयत्नाची पराकाष्टा केली. म. गांधीजींनी स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार केला. बाल विवाह, हुंडा, सतीची चाल या अनिष्ट प्रथांना विरोध केला. राष्ट्रीय आंदोलनात, चळवळीत स्त्रियांना सहभागी करून

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

घेतले. राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, महर्षी धोंडो केशव कर्वे, म. जोतीबा मुले, रमाबाई रानडे, ईश्वरचंद्र विधासागर आदी समाजसुधारकांनी जनजागरण करून चळवळी उभ केल. त्यांनी समाजाची जहरी टीका सहन केली. आज स्त्री शिक्षणाचा प्रसार झालेला दिसतो व स्त्री पूर्वीपेक्षा मानाने वावरू लागली आहे याचे श्रेया समाजसुधारकांना आहे.

**६. स्त्री शिक्षणाचे गरज :**

शिक्षण हे स्त्रीयांच्या प्रगतीचे इंजिन मानले जाते. समाजातील स्त्रीवर होणारा अन्याय दूर करायचे असेल तर स्त्री शिक्षण महत्त्वाचे आहे. याची जाणीव सावित्रीबाई फुले यांना झाली. म्हणून त्यांनी वेळप्रसंगी समाजाचे दगड गोटे, चिखल सहन करून स्त्रियांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. स्त्री शिक्षणामुळे स्त्रीचा विकास साधला जातोच, पण त्याबरोबर कुटूंबाचा दर्जा उंचावण्यास खूप मदत होते. एक सुसंस्कारीत स्त्री कुटूंबातील सर्व घटकांना मार्गदर्शन करू शकते. शिक्षणाचे महत्व तिला पटलमुळे ती सार कुटूंबाला शिक्षित करू शकते. कुटूंबातील लहान मुलांवर तिचे संस्कार होतात. मुलांची व्यक्तिमत्वे घडविण्यात आईचा वाटा मोलाचा असतो. बालकाला योग्य प्रकारे घडविण्यासाठी माता सुशिक्षित व सुसंस्कारीत असणे अत्यंत गरजेचे असते. सुशिक्षित माता आपल मुलांच आरोगची योग्य प्रकारे काळजी घेते. मुलांना चांगल सवयी लावते, त्यांचा अभ्यास घेते. त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करते.

६.१ भारतातील अनेक समाज सुधारकांच्या प्रयत्नांमुळे त्या काळात कर्मठपणाच ओझ्याखाली दबलेली स्त्री शिक्षणामुळे ज्ञानी होऊ लागली. स्त्रीला तिच्या हक्कांची जाणीव झाली. स्वातंत्रयोत्तर काळात भारती संविधानात स्त्री पुरूषांना शिक्षणाची व विकासाची समान संधी प्रदान केली आहे. या सर्व प्रत्नांमुळे समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम असले तरी शिक्षणामुळे स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा झाली व होत आहे. आजची स्त्री पुरूषांप्रमाणेच अर्थार्जन करते. निरनिराळे व्यवसाय करते. कालाविष्कार करते, नोकरीची सर्व क्षेत्रे तिने काबीज केली आहेत. राजकारणातही आज ती मोठमोठी पदे भूषवित आहे. याची उदाहरणे सांगायचीच झाली तर आकाशाला गवसणी घालविणारी सुनिता विल्यम्स, भारताच माजी पंतप्रधान कै. इंदिरा गांधी, ममतेचं करूणेचं आणि त्यागाच ज्वलंत उदाहरण मदर तेरेसा, गुन्हेगारांचा कर्दनकाळ ठरलेली महिला पोलिस अधिकारी किरण बेदी, सुवर्णकन पी.टी. उषा, अशी कितीतरी उदा. सांगता येतील.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

६.२ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची वाट स्त्रियांना दाखवली आणि लाखो स्त्रियांनी त्यावर चालत आपल कर्तृत्वाच्या दिशा निश्चित केल्या. आज अनेक क्षेत्रात तिने आपल्या कार्याची मोहोर उमटवली. पण तिच्या मानसिकतेचा विचार केला तर आजही ती विविध समाज बंधनात जखडलेली दिसते. स्त्री जरी विविध क्षेत्रात नोकरी करत असली तरी तिच कौटूंबिक जबाबदारीमात्र कमी झालेली दिसत नाही. नोकरीच्या ठिकाणी येणाऱ्या अनेक समस्यांही त्यांना भेडसावत आहेत. कुटूंब आणि नोकरी दोन्ही समर्थपणे सांभाळाचे म्हणजे अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागते. संसार आणि नोकरी यापैकी कोणत्याही एका ठिकाणी दुर्लक्ष करून चालत नाही. हे दोन्ही घटक सांभाळताना स्त्रिचा जीव मेटाकुटीला येत नसेल तरच नवल!

६.३ आपल मुलांवर संस्कार करण्याची खरी जबाबदारी आईची. पण कर्तृत्वाच्या दाही दिशा मोकळया झालेल्या स्त्रिला जर नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडावे लागले तर तिला मुलांसाठी पुरेसा वेळ देता येत नाही. वाढत्या औदयोगिकरणाने विभक्त झालेल्या कुटूंबात आधीच आजी आजोबा नसतील तर साहजिकच मुलांकडे दुर्लक्ष होऊ शकते. याचा मुलांवर वाईट परिणाम होऊन ते वाईट मार्गाला लागू शकतात.

## ७. स्त्रियांचे कायदेशीर हक्क

एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रीयांना न मिळालेले आर्थिक हक्क विसाव्या शतकाच्या पंचविशीत विधवा वारसाहक्काचे विधेयक संमत झाल्याने मिळाले. व्दिभार्याप्रतिबंधक, घटस्फोट हे हक्कही मिळाले. भारतीय स्त्रीविषक कायदे हे समाजाच अग्रेसरच राहिले आहेत असे दिसते. किंबहुना, आजचे कायदे स्त्रियांना अधिक अनुकूल आहेत असे म्हटले जाते. शहाबानो प्रकरणी झालेल्या तरतूदींनीमुस्लिम स्त्रियांना कायदयाने मागे नेवून ठेवले आहे असेही म्हणता येते, पण पोटगी, वारसाहक्क, हुंडाबंदी, व्दिभार्याप्रतिबंधक, स्त्रियांसाठी आरक्षण अशा अनेक कायदयांची अंमलबजावणी होण्यासाठी प्रबोधनांची गरज आहे, आणि हे काम अर्थातच शिक्षणाचे आहे. अन्यथा कायदे कागदावर राहतील आणि स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार वाढतच राहतील.

स्त्रियांसाठी विशेष कायदे करण्यासाठी संविधानानेच तरतूद करून ठेवली आहे.

स्त्रियांना समाजाच्यामुख्य प्रवाहात आणण्याची गरज स्वातंत्र्य आंदोलनापासूनच जाणवू लागली होती. या दृष्टीने भारतीय संविधान तयार करतानाच त्याची काळजी घेतली गेली. संविधानाचे पंधरावे कलम धर्म, वंश, जात, लिंग या आधारे नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचे भेद करण्यास मज्जाव करते, पण या कलमामुळे स्त्रिया

आणि मुले यांच्यासाठी विशेष तरतूदी करण्यावर बंधन येणार नाही असेही कलम १५ (३) मध्ये स्पष्ट केले आहे.

सुरूवातीच पंचवार्षिक योजनांमध्ये स्त्रियांचा विकास हा प्रधान मुद्दा नव्हता. १९५३ मध्ये केंद्रीय समाजकल्याण मंडळाची स्थापना झाली. महिला व बाल कल्याणाकडे या मंडळाने लक्ष पुरवायचे होते. या मंडळाच्यामाध्यमातून स्त्रियांसाठी विशेष कायदे करून त्यांना समान दर्जा देण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्याअंतर्गत १९७६ साली समान वेतन कायदा पारित झाला. १९८५ साली महिला कल्याणाचा स्वतंत्र विभाग सुरू झाला. स्त्री कामगारांच्या कायदयांमध्ये आणि स्त्रीयांना न्याय मिळवून देण्याकडे हा विभाग विशेष लक्ष देतो.

**८. विविध आयोग व समित्या :**

स्त्रीयांना सार्वत्रिक शिक्षण मिळण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये विविध आयोग व समित्यांचे गठन करण्यात आले. त्यामधून स्त्रीयांना समान दर्जा मिळावा, शिक्षणासाठी अनुदान व मदत मिळावी. तसेच विशेष संधी मिळाव्यात, त्यांच्यासाठी मुलींच्या स्वतंत्र शाळा, महाविद्यालये व इतर व्यावसायिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने या गठित झालेल्या समित्यांनी सुचविलेल्या शिफारशीनुसार शिक्षणक्षेत्रामध्ये स्त्रीयांना संधी मिळू लागल्या. काही महत्वाचे आयोग पुढीलप्रमाणे :

**८.१ विदयापीठ शिक्षण आयोग (राधाकृष्णन कमिशन) १९४८**

योग्यत्या सर्व सोयी व सुविधा महाविदयालयात स्त्रियांना उपलब्ध व्हाव्यात. अधिकाधिक शैक्षणिक संधी उपलब्ध व्हाव्यात. बौध्दिक व शैक्षणिक मार्गदर्शन मिळाले पाहिजे. त्यामुळे त्यांना योग्य, आवश्यक ते शिक्षण मिळेल व त्याप्रमाणे स्त्री पुरूषांचा अभ्यासक्रम समान असेल पण सारख्याच असणार नाही. गृहविज्ञान, गृह अर्थशास्त्र, गृहव्यवस्था इत्यादी विषयांबद्दलच पूर्वदुषित ग्रह नाहीसा करणे आवश्क आहे. स्त्री शिक्षक व प्राध्यापकांना समान वेतन मिळाले पाहिजे.

**८.२. माध्यमिक शिक्षण आयोग : (मुदलियार कमिशन) १९५२**

आयोगाने मुलामुलींसाठी समान शिक्षणाची शिफारस केलेली आहे. अभ्यासक्रमातील सर्व विविध शाखांचे शिक्षण मुलांप्रमाणेच मुलींना उपलब्ध झाले पाहिजे. शेती, अभियांत्रिकी शिक्षण, वैद्यकशास्त्र, व्यापार, कायदा, शास्त्र, कला इत्यादी विविध शाखांत स्त्रियांना प्रवेश हवा व तसा प्रवेश मिळाल्यावर स्त्रिया प्रगती करू

शकतात याची दखल कमिशनने घेतली आहे. अर्थात त्यांचे प्रमाण अगदी कमी आहे. अर्थातच सुखी व आनंदी कुटूंबासाठी व चांगली मुले होण्यासाठी आवश्यक असलेले गृहजीवन शिक्षणही मुलींना स्त्रियांना मिळावे.

**८.३. भारतीयशिक्षण आयोग (कोठारी कमिशन) १९६६**

स्त्री शिक्षणाच्या समस्येची उकल करण्यासाठी दोन दृष्टिकोनांचा विचार केला पाहिजे. एक म्हणजे भारतीय स्त्री शिक्षण समितीने सुचविलेल्या विशेष कार्यक्रमावर भर देणे व दुसरे म्हणजे शिक्षणातील सर्व स्तरांवरील विभागात मुलींच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवून त्यांचा विस्तार करणे व त्यात सुधारणा वाढविणे व ते शिक्षण सर्व शिक्षणाचे एक अविभाज्य अंग राहिल इकडे लक्ष दिले पाहिजे. येत्या काही वर्षात शैक्षणिक कार्यक्रमात स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे, आणि मुले व मुली (स्त्री व पुरूष) यांच्या शिक्षणातील तफावर दूर करण्यावर भर दिला पाहिजे. यासाठी विशेष कार्यक्रम, योजना आणून त्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध करण्याला अग्रक्रम दिला पाहिजे. राज्य पातळीवर व केंद्र पातळीवर मुलींच्या व स्त्रियांच शिक्षणासाठी विशेष यंत्रणा उभारून शासकीय वा खासगी पातळीवरील विविध संस्थांच्याकार्यामध्ये समन्वय घडवून आणणेही तितकेच महत्वाचे आहे.

**८.४ स्त्री शिक्षण राष्ट्रीय समिती**

I समितीने स्त्री शिक्षणाच्या कार्याला वेग देण्यासाठी खालील शिफारशी केलेल्या आहेत.

६–११ वयोगटातील सर्व मुली १९७६ पर्यंत शाळेत आणणे तसेच १९८१ पर्यत ११ ते १४ वयोगटातील सर्व मुली शाळेत आणणे. स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाच्या सोयी करणे, शाळा उघडणे, शाळेतील मुलींना जेवण, पुस्तके, गणवेश पुरविणे इत्यादी उपक्रम करणे. तांत्रिक शिक्षण विद्यालये सुरू करणे. शासनाने स्त्री शिक्षणविषयक उपक्रमांना आर्थिक सहाय्य देणे. मागास भागातील ग्रामीण भागातील व डोंगराळ भागातील काम करणार स्त्री शिक्षकांची राहण्याची सोय करून त्यांना विशेष भत्ता देणे. जेथे मुलींसाठी स्वतंत्र विदयालये नाहीत तेथे सहशिक्षणाला उत्तेजन देणे इ.

**८.५. भक्तवत्सलम कमिटी : १९५३**

राष्ट्रीय स्त्री शिक्षण सल्लागार मंडळाने श्री. एम. भक्तवत्सलमयांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण भागातील स्त्री शिक्षणासंबंधी विचार करण्यासाठी समिती नेमली. कमिटीने स्पष्टपणे नमूद केले आहे की स्त्री शिक्षणाचा वेगाने प्रसार होण्यासाठी जनमत जागृती अत्यंत आवश्क आहे. कारण स्त्री शिक्षण विषयक कोणतेही

उपक्रमयशस्वी होण्यासाठी जनतेचे सहकार्य असणे आवश्यक आहे. जनतेने उपक्रमात पुढाकार घेणे व स्वयंसेवी संघटनांनी त्यांना सहकार्य देणे असे घडले तर स्त्री शिक्षणाचा प्रसार वेगाने होईल.

**समारोप**

ज्या देशामध्ये स्त्रीयांना शिक्षणामध्ये नोकऱ्यांमध्ये व व्यवसायामध्ये संधी दिली जाते तो देश व समाज विकसित समाज म्हणून ओळखला जातो. जगातील सर्वच विकसित देशामध्ये स्त्रीयांना समानतेची वागणूक व संधी दिली जाते. एकूण लोकसंख्यपैकी ५० टक्के लोकसंख्येला जर शिक्षण आणि व्यवसायापासून वंचित ठेवले तर तो समाज कधीही प्रगती करणार नाही. स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्त्री शिक्षणाला चालना मिळत गेली. समाजसेवक, समाज व शासन यांच्या एकत्रित प्रयत्नाने स्त्री शिक्षण व सामाजिक सहभागात स्त्रीचे स्थान नक्कीच उंचावले आहे. केवळ घटनेने स्त्रीला अधिकार देवून पुरेसे नाही तर प्रत्येक पुरूषाने स्त्रीला शिक्षणासाठी व सामाजिक सहभागासाठी पुढाकार घेतला पाहिजे व प्रेरणा दिली पाहिजे. तरच स्त्री पुरूष समानतेचे घटनेने दिलेले तत्व पूर्णत्वास येईल.

**संदर्भ**

*नरवणे, मीनल (१९९९), भारतातील शैक्षणिक आयोग व समिती, पुणे : नूतन प्रकाशन.*

*पाटील, लीला आणि कुलकर्णी, विश्वंभर, (१९९०), आजचे शिक्षण आजच्यासमस्या (४थी आवृत्ती), पुणे : सुविचार प्रकाशन.*